
किल्ले
तुंग
ॐकार झांजे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# किल्ले तुंग

लेखक : ओंकार अशोक झांजे

# किल्ले तुंग


## लेखक- ओंकार अशोक झांजे

पत्ता- मु पो बिरवाडी, ता महाड, जि रायगड महाराष्ट्र, 402 302

omkar.zanje1@gmail.com

7770099295




या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com
www.esahity.in
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway, Thane.
www. esahity.com
APP : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

**प्रकाशन : ७ नोव्हेंबर २०२०**

©esahity Pratishthan® 2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

ओंकार अशोक झांजे

संपर्क 7770099295

ईमेल omkar.zanje1@gmail.com

## दोन शब्द...




नमस्कार, मी ओंकार अशोक झांजे ! कोकणातलं रायगड किल्याच्या सहवासात असलेलं महाड हे माझं गाव. मी पुणे इथुन विद्युत अभियांत्रिकी पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. शाळेत असल्यापासून पुस्तकं वाचण्याची खूप आवड होती. तेव्हा वाचलेल्या पुस्तकांपैकी माझी आवडती पुस्तके म्हणजे रणजित देसाई यांचे श्रीमान योगी, वीणा गवाणकर यांनी अनुवादित केलेलं 'एक होता कार्व्हर' कलामांचं 'अग्निपंख' इ. पुढे डिप्लोमाला गेल्यापासून मराठी वाचन थांबलं. कारण अनेक इंजिनीयरिंग कॉलेजच्या लायब्ररीत

मराठी (वाचण्याजोगी) पुस्तके नसतात. (हीच खंत) पुढे इंटरनेटवरून माझी ओळख ईसाहित्य प्रतिष्ठानशी झाली आणि पुन्हा एकदा मराठी वाचनाच्या प्रेमात बुडालो. मी पहिलं वाचलेलं ईबुक स्मिता पाटील यांचे 'कलाटणी' माझं अजूनही आवडतं पुस्तक आहे. माझ्या लेखनाबद्दल सांगायचं झालं तर लहानपणी छोट्या छोट्या काल्पनिक कथा लिहायचो. या शिवाय मला कविता लिहिण्याचा छंद आहे.

पण तेव्हा हे सगळे लिखाण कुठेच प्रकाशित केले नव्हते. द्वितिय वर्षाच्या इंजिनीरिंगच्या परीक्षा झाल्यानंतर सहज डायरी लिहायला बसलो आणि मला ओम्लि 2050 ही कथा सुचली व मी ती पटकन लिहून काढली. मग टाईप करून माझ्या जवळच्या व्यक्तींना दाखवली व त्यांना ती खूप आवडली. ही कथा ईसाहित्य प्रतिष्ठानतर्फे प्रकाशित करण्यात आली आणि त्याला उदंड

प्रतिसाद मिळाला. तिथुन पुढे मग मी कथा लिहिणे सुरु ठेवले. त्यानंतर पाहिले न मी तुला, मैत्री विजेशी भाग 1 व 2 प्रकाशित झाले. या सर्वच ईबुक्सना खुप चांगला प्रतिसाद मिळाला. वाचन आणि लिहिण्यासोबतच मला नवनवीन ठिकांणाना भेटी द्यायला आवडतात. गेल्या वर्षी कॉलेज संपल्यावर मावळातील तुंग किल्ल्याला भेट दिली होती. ही एक आठवणीत राहील अशी भ्रमंती होती. म्हणूनच मी हा प्रवास आपल्यासमोर उलगडत आहे. या प्रवासात ई साहित्य टीमचं आणि सुनील सामंत सर यांचं मोलाचं योगदान आहे. माझे कुटुंबिय ज्यांच्यामुळे मला प्रवासाची सवय लागली त्यांचा मी सदैव ऋणी आहे. तसेच कुठ्लाही ट्रेक ठरवल्यावर लगेच तयार होणारे माझे सर्व मित्रमैत्रिणी यांचेही आभार ! हे प्रवासवर्णन आपल्याला आमच्या ट्रेकचा जिवंत

अनुभव देईल व आपल्या पसंतीस नक्कीच उतरेल अशी आशा बाळगतो आणि आपला निरोप घेतो.

-ओंकार अशोक झांजे

अर्पणपत्रिका

दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरणी हे पुस्तक अर्पण



असं म्हणतात Unplanned trips are the best म्हणजे कोणतीही पूर्वतयारी न करता अचानक ठरलेले प्रवास हेच सर्वात चांगले असतात.बऱ्याच वेळा आपल्या ट्रिप सोबत असंच होतं परंतु काही वेळा आपण प्लॅन केलेले आणि त्यानंतर ऐनवेळी ठरवलेले प्रवास दोन्ही फसतात अशावेळी काय होतं?

वर्ष: २०१९

महिना: जून

माझं इंजीनियरिंगचं शेवटचं वर्ष होतं. एव्हाना आमचे शेवटचे पेपर झाले होते. फक्त प्रोजेक्ट बाकी होता आणि त्यासाठी आम्हाला १५ जूनपर्यंत थांबावं लागणार होतं. कॉलेज म्हटलं की आपल्याला आठवतात ते म्हणजे सोनेरी दिवस. कॉलेजच्या ट्रिप्स, इंडस्ट्रियल विजीटच्या नावाखाली फिरलेली ठिकाणे, बुडवलेले लेक्चर्स, रात्री सेलिब्रेट केलेले मित्र-मैत्रिणींचे वाढदिवस आणि बरंच काही...

पुण्यातला कॉलेजचा आणि आम्ही सगळे एकत्र असण्याचा हा शेवटचा महिना होता. आत्तापर्यंत आम्ही बऱ्याच वेळा वेगवेगळ्या ठिकाणी फिरून

आलो होतो. पण शेवटच्या काही महिन्यांमध्ये प्रोजेक्ट सबमिशन आणि परीक्षा यांचं इतकं ओझं झालं की सगळेच कंटाळले होते अशावेळी ताजेतवाने होण्यासाठी एक ट्रिप तर व्हायलाच हवी होती. या विचारावर सगळ्यांचं एकमत झालं. कॉलेजमध्ये कॅन्टीनला आम्ही कुठे जायचं हे ठरवू लागलो. अनेक ठिकाणे सुचवण्यात आली. यात अर्थातच गोवा, महाबळेश्वर, माथेरान इत्यादी नेहमीची ठिकाणे होतीच आणि ती नेहमीप्रमाणे रद्द होणार हे सुद्धा ठरलेलंच होतं. ही आमची कॉलेजची शेवटची ट्रीप होती. त्यामुळे बराच वेळ चर्चा झाली. परंतु काही ठरेना !

**शेवटी फिरायला जायच्या आधीचा दिवस उजाडला...**

**१० जून**

बघायला गेलं तर हा नेहमीसारखाच एक रटाळ दिवस होता त्यात पुन्हा पुणे सोडणार, कॉलेज संपणार म्हणून मनात निराशेचे ढग दाटले होते. थोडी रुखरुख लागून गेली होती. सायंकाळी आम्ही शाहू गार्डनला एकत्र जमलो. आमच्या रुमवरचे आम्ही चौघे, दुसऱ्या रुमवरचे दोघे आणि इतर तीन मुली एवढी ही मंडळी! गप्पाटप्पा सुरू झाल्या आणि काही वेळाने पुन्हा मुद्यास हात घातला. चर्चा सुरू झाली. ट्रेकला जायचं का विचारल्यास एकाने पर्वती सुचवलं. ती टेकडी चढून येऊ की झालं ट्रेकिंग. यावर सगळ्यांचा हशा पिकला. त्यामुळे हे ठिकाण काही बहुमतात मंजूर झालं नाही. कोणतंच मॉल, गार्डन्स बघायचे नव्हते हे सुद्धा ठरलं. पुणे शहरातली मुख्य पर्यटनस्थळे तर गेल्या तीन वर्षात पाहून झाली होती. आम्ही सगळे पुन्हा विचार करू लागलो. मग दोन ठिकाणे तरी ठरली. एक म्हणजे जेजुरी जे काही लोकांनी पाहिलं

होतं पण काही लोकांनी नव्हतं पाहिलं. दुसरं मी सुचवलं तुंग किल्ला आणि पवना तलाव. हे कुणीच पाहिलं नव्हतं. उन्हाळ्याच्या शेवटी एखाद्या किल्ल्यावर जाऊन काय बघायला मिळणार हादेखील प्रश्नच होता. पवना लेकला कॅम्पिंग असतं असं ऐकून होतो. त्यामुळे तिथंही जाता आलं असतं. पण आता या दोघांपैकी कुठं जावं हेच ठरत नव्हतं. फार चर्चेनंतर ठरलं की किल्ल्यावर जायचं आणि पवना धरण पहायचे...!

चला...

आम्ही रुमवर परतलो. आता पुढचं काम गाड्या जुळवायचं होतं. माणसं जास्त आणि गाड्या कमी हे नेहमीचं समीकरण होतं. म्हणून वर्गातले जेवढे मित्र होते त्यांना कळवलं. पण कोणीच शेवटी तयार झालं नाही. काही वेळाने

ट्रेकला येणाऱ्या एका मैत्रिणीचा फोन आला की ती नाही येत आहे. कारण हे होतं की घरच्यांनी ट्रेकिंगला सध्या नको जाऊस असं सांगितलं होतं. पुन्हा हा मुद्दा ऐरणीवर आला. हल्ली टीव्हीला बातम्यांना अनेकदा दाखवतात की अमुक ठिकाणी ट्रेकिंगला गेलेल्या कड्यावरुन पडून तरुणाचा मृत्यू वगैरे वगैरे. अशा गोष्टींनी पालकांच्या मनात अजून भीती वाढते. खरंतर काळजीपोटी ते योग्य आहेच. त्यात काही गैर नाही. पण सुरक्षितपणे बिना टवाळक्या करताही किल्ले फिरून येता येतात हेही खरेच! त्यामुळे गडभटक्यांना घरातून होणारा विरोध व मनधरणी हा अनुभव नेहमीचाच असतो. असो! आमचा प्लॅन मग पुन्हा बदलला. अर्थातच जेजुरीला जायचं ठरलं आणि आता तर बाईक जुळवायचा प्रश्न सुद्धा मिटला होता. कारण आम्ही एसटी बसने जाणार होतो. चला... कुठे ना कुठेतरी जायचं ठरलं म्हणून

आम्ही सगळे खुश होतो. सकाळी आठ वाजता जेजुरीला जायला एसटी आहे असं चौकशी करून कळालं. त्यामुळे सकाळी लवकरच निघायचं आम्ही ठरवलं. काही जण अजूनही गोंधळात होते की कुठे जायचं आहे. काही मित्र काही कारणास्तव येणार नाहीत असं त्यांनी कळवलं आणि प्रत्यक्ष येणाऱ्यांची संख्या हातांच्या बोटापेक्षाही कमी झाली. सगळा प्लॅन ठरला. खरंतर त्या दिवशी लवकर झोपायला हवं होतं. पण सगळं ठरवण्यातच वेळ गेला आणि रात्री झोपायला खूप उशीर झाला. मोबाईलमध्ये गजर लावुन आम्ही एकदाचे झोपलो...

सकाळ झाली. आम्ही सगळे उठलो आणि मोबाईलमध्ये टाईम बघितला..

आतापर्यंत तुम्हाला कळून चुकलं असेल की आमचा प्लॅन जवळ-जवळ फिसकटला होता. सकाळी उठायला उशीर झाला होता आणि सगळे पारोशे चेहरे करून एकमेकांकडे घुबडासारखे बघत होते.. बाकीच्यांना आम्ही फोन लावला. कोणी उचलला नाही. तर कोणी फोन लावल्यावर उठलं. सारे मुसळ केरात!

शेवटची ट्रिप ही अशी कॅन्सल व्हावी आणि अशी फजिती व्हावी...?

छे! शक्यच नाही. आज काहीही झालं तरी जायचंच. भलेही ते पर्वती का असेना मग ठरलं.

सकाळचे ८ वाजले होते. जेजुरीला जायला पुढची बस किती वाजता आहे ते स्वारगेट डेपोला फोन करून विचारलं. पुढची बस दहा वाजताची होती

आणि तिने जाणे म्हणजे अयोग्य निर्णय होता. एवढ्या रणरणत्या उन्हात जाणे म्हणजे खतरों का खेलच होता. आता काय करावं हा विचार सुरू झाला. तुंग किल्ल्यावर जायचं ठरलं. अर्थात तिथेही जायचं म्हणजेच भर उन्हात जाणं भाग होतं. पण गेले काही दिवस पावसाच्या सरी येऊन गेल्या होत्या. त्यामुळे शहरापासून दूर असलेल्या या डोंगरदऱ्यांमध्ये थोडं तरी वातावरण सुखद असेलच असा अंदाज आम्ही लावला. पुन्हा गाड्यांचा प्रश्न आला. माणसं होती सात आणि गाड्या होत्या दोनच! थोडं ॲडजस्ट करून तीन गाड्या झाल्या. तरीही एक उरतच होता. कारण शहरातून लोणावळ्यापर्यंत हायवेला ट्रिपल सीट जाणे शक्य नव्हतेच व पुढे रस्ता चांगला असेल की नाही माहित नव्हतं आणि गाड्यांची कंडीशनही तितकी चांगली नव्हती. विचार करायला फार वेळ नव्हता. कारण जायचं असेल तर लवकर निघणं भाग होतं. ठरलं... एक

जण म्हणजे मी ट्रेनने तळेगावपर्यंत जाणार होतो व तिथून हायवेला डावलत साध्या रस्त्याने ट्रिपल सीट जाणार होतो. वेळ वाया घालवण्यात काहीच अर्थ नव्हता. नऊची लोकल होती. आता साडेआठ वाजले होते. सगळ्यांनी या कल्पनेला होकार दिला.

नेहमीप्रमाणे सर्वांनी एकत्र येण्याचा येण्याचे ठिकाण हे मंगळवार पेठेतल्या आमच्या रूम खालीच होते आणि फायनली आम्ही निघालो...

आम्ही सात जण मी, प्रणित टेंबे, प्रणित निमकर, घना ठाकूर, अभिषेक एकल आणि बेनझीर मेश्राम, सृशांत वानखेडे.

बाईकवाल्यांना ट्रॅफिकमुळे जास्त वेळ लागेल असे पकडून आम्ही त्यांना आधीच पाठवले. मला सृशांत आणि प्रणितने स्टेशनला सोडले. मी पुणे स्टेशनला ट्रेन पकडली.

तुंग किल्ल्यावर जायला पुणे शहरातून दोन मार्ग आहेत. एक लोणावळ्याच्या आधी हायवेवरून तळेगावला आत फाटा फुटतो. तिथून तिकोना मार्गे व दुसरा रस्ता पुढे लोणावळ्याला जाऊन मागे येणे. तळेगावला जाणारा रस्ता कमी अंतराचा आहे व ह्या रस्त्याने किल्ल्याला पूर्ण गोल वळसा घालून पायथ्याशी पोहोचता येते. कमी अंतर असल्याने आम्ही हाच रूट ठरवला होता. पण गूगल मॅप्स मध्ये दिसतं तसं खरोखर नसतं याचा प्रत्यय पुन्हा एकदा मला आला. मला सुदैवाने तळेगाव लोकल मिळाली. मी ईयरफोन लावले आणि गाणी सुरू झाली...

महकी सी हवाओं में

चले हैं हम कहीं,

हम जो चाहे दिल को

वो पता है या नही...

हम चले बहारों मे

गुनगुनाती राहों में,

धड़कने भी तेज़ हैं

अब क्या करें...




सृशांतची गाडी मला घ्यायला तळेगावला थांबणार होती. मी तासाभरात तळेगावला पोहोचलो. तिथून एसटी स्टँड व हायवे शोधेपर्यंत काही वेळ गेला. अखेर आमची गाठभेट झाली. सृशांत, प्रणित आणि मी तिघे बाईकवर स्वार झालो आणि जीपीएस चालू केले. बाकीच्या दोन गाड्या पुढे-मागे होत्याच. पण मोबाईलला रेंज नसल्याने त्यांच्याशी अधूनमधून संपर्क तुटत होता. आम्ही गाडीत पेट्रोल टाकून स्पीड वाढवला. काही वेळाने डाव्या बाजूला फाटा फुटला होता. त्याने आम्ही पुढे निघालो.

काही वेळ सुरळीतपणे प्रवास झाला. पण पुढे गेल्यावर हा रस्ता खराब निघाला आणि आपण कमी अंतराचा रास्ता निवडून चूक केली असंच मनोमनी बोलू लागलो. थोड्या वेळाने आम्हाला पवना धरण दिसले. पण येताना ते पाहू असं आम्ही ठरवलं. मध्ये कोणतेतरी गाव लागले होते. तिथे

नाश्ता केला. अशा वेळी कॉमन नाश्ता म्हणजे वडापाव. शिवाय  वर जाऊन खायला काहीतरी घ्यायचं असंही ठरवलं होतं...

अजून थोडे किमी कापल्यावर विस्तीर्ण असा जलाशय आमच्या उजव्या बाजूला दिसू लागला आणि दूरवर एक उंच मनोरा असल्यागत टोक दिसत होते. तोच तुंग किल्ला आम्ही बरोबर ओळखले...





खरंतर तो दिसायला सरळ अंतरावर असला तरी मध्ये रस्ता नव्हता व आम्हाला पवना लेकला संपूर्ण वळसा घालून जायचं होतं. तेव्हा कुठे आम्ही किल्ल्याचा पायथा गाठणार होतो. दुसऱ्या दोन गाड्यांनी वेगळा मार्ग निवडला होता. ते सरळ लोणावळ्याला गेले. आम्ही मात्र गुगल मॅपच्या भरवशावर कमी वेळ दाखवत आहे असं म्हणत निवांत चाललो होतो आणि काही वेळातच पुढे भलीमोठी चढण लागली आली. पूर्ण टेकडी चढून उतरायची होती.

त्यानंतर सपाट रस्ता लागणार होता. आम्ही ट्रिपल सीट त्यात गाडीची अवस्था वाईट. अशातच पुढे एवढे मोठे दिव्य पाहून आमची पुरती...

आम्हाला उजव्या बाजूला एका गावातून जाणारी कच्ची वाट दिसली. वाटेत एक माणूस भेटला.  आम्ही त्याला विचारले की हा रस्ता पुढे जाऊन याला मिळतो का? त्या वाटाड्याने हो म्हटले. आम्हाला थोडा धीर मिळाला. मग काय आम्ही त्या वाटेने जाऊ लागलो. शॉर्टकट्सची पहिल्यापासून सवय ना! काही अंतर गेल्यावर कळले की ती वाट आधीच्याहून भयंकर होती. तिच्यात खाचखळगे इतके होते की यमसदनाची आठवण व्हावी. त्यात ट्रिपल सीटचे दुखणे वेगळेच. पुढचा अर्ध्या टाकीवर चिकटून, मागचा अर्ध्या दांड्यावर बसून व मधला बिचारा दोघांमध्ये सॅंडविच...!

पुढे गेल्यानंतर आम्हाला अजूनच खडतर वाटू लागले. म्हणून आम्ही मागे फिरलो. वाटेत एक आंब्याचे झाड दिसले. त्यावर बऱ्याच कैऱ्या लगडलेल्या होत्या. आम्ही बऱ्याच कैऱ्या गोळा केल्या व पुढे निघालो. आता ती भली मोठी घाटवाट पार करण्यावाचून मार्ग नव्हताच. हळूहळू एकमेकांना धीर देत हा टप्पा पार केलाच.  मोबाईलची रेंज गेली होती. त्यामुळे बाकीचे लोक कुठे आहे हे कळायला मार्ग नव्हता. दूरवर उत्तुंग नभाला भेदणारा तुंग किल्ला दिसत होता. त्याच्या आणि आमच्या मध्ये पवनेचा विस्तीर्ण जलाशय आणि





आमची प्रदक्षिणा ही चालूच होती. काही वेळाने आम्हाला तिकोना किल्ल्याचे दर्शन झाले अगदी जवळून...

थोडा वेळ आम्ही फोटोग्राफी केली. त्या वेळी जेसीबी खूप चर्चेत होता आणि नेमका आम्ही फोटो काढला तेव्हा तिथून जेसीबी गेला आणि फोटोत क्लिक झाला. काहीवेळासाठी तर असं वाटलं की

तिकोना सोप्पा वाटतोय तोच पाहून यावा. तसही तुंग किल्ला खूप दूरवर वाटत होता. तिकोन्याचे रूप दूरवरून फार लोभसवाणे वाटत होते. काही वेळाने मोबाईलला रेंज आली. दोन्ही गाड्यावरून येणाऱ्या मित्रांशी आमचा संपर्क झाला. तेही पोहोचणार आहेत असं कळालं. फोनमध्ये दाखवणाऱ्या वेळेनुसार ते आमच्यापेक्षा पंधरा मिनिटे उशिरा पोहोचणार होते. आम्ही त्यांना वाटेत थांबून काहीतरी खायला घेऊन यायला सांगितलं होतं. पण त्यांच्या वाटेत कोणतंच हॉटेल लागलं नाही आणि आम्ही सोबत आणलेल्या चाऱ्यावरच (म्हणजे बिस्किट, चिप्स) आम्हाला गुजारा करावा लागला. पुढे रस्ता सुद्धा खराब होता. आता शिखर जवळ येऊ लागलं होतं...

काही वेळाने किल्ला दिसेनासा झाला आणि आणि आपण चुकीचं तर जात नाही ना अशी शंकेची पाल मनात चुकचुकली. पण मॅप्स वरून बघितल्यावर कळलं की आता फक्त वीस मिनिटांतच आपण किल्ल्याच्या पायथ्याशी पोहोचू. उर आनंदाने भरून आलं तरीही खाचखळग्यांमुळे तिघांची जी अवस्था झाली होती. त्यामुळे स्वतःचेच हसू येत होते. मला वाटले तेव्हा सकाळचे अकरा तरी वाजले



असतील. पण या निसर्गरम्य वातावरणात आल्हाददायक वाटत होतं. वातावरण किंचित ढगाळ होतं. पण सारं काही सुखद वाटत होतं.

अध्येमध्ये दोनतीन गावसुद्धा लागली आणि फायनली तो क्षण आला. आमचा वेढा पूर्ण झाला होता आणि अजस्त्र असा तुंग किल्ला उंच मनोऱ्यागत जणू आमच्या नजरेसमोर ठाकला. गर्द झाडीतुन रस्ता सुरू झाला आणि काही क्षणातच आम्ही किल्ल्याच्या पायथ्याशी पोहोचलो...



पुढे जो रस्ता गेला होता तो तुंग वाडी गावात जाणारा रस्ता होता. इथेच एक हनुमानाचं मंदिर आहे आणि बाजूला विस्तीर्ण असं उंबराचं झाड आहे. आम्ही तिथं गाडी लावली अन थोडं रिलॅक्स केलं. बाजूने हिरव्यागार झाडांनी हा परिसर नटला होता. या सावलीत दोन क्षण विसावा घेण्याची मजा ही काही औरच होती. काही वेळात बाकीचे चौघेही आले आणि जीवात जीव आला.

त्यांनी सांगितले की आलो तो रस्ता तर चांगला होता. त्यामुळे जाताना तिकडूनच जायचं असं ठरवलं. आजूबाजूला काही करवंदीची जाळी होती. काट्यातून तिथली करवंदे वेचुन खाऊन मन तृप्त केलं. थोडीशी पेटपूजा केली कारण भला मोठा गड चढायचा होता.




सगळे संपूर्ण तयारीनिशी आले होते. आम्ही मार्गस्थ झालो. वाटेत पहिल्याच लागलेल्या फलकावर किल्ल्याची संपूर्ण माहिती मिळाली. हा किल्ला घाट संरक्षक दुर्ग म्हणून ओळखला जातो व मावळ प्रांतातील बोर घाटावर नजर ठेवण्यासाठी याचा प्रामुख्याने वापर होत असे. थंडगार वाऱ्यातून पायवारी करत परत आम्ही चाललो होतो. आता चढण सुरु झाली. दगडा दगडांतून वळणा-वळणाचा रस्ता होता. पण तो नॉर्मल होता. पाऊस पडून गेल्यामुळे माती किंचित ओली झाली होती. काही नवीन झुडपं तरारली होती. गप्पा मारत आम्ही वर चालू लागलो. आता रस्ता आणखी खडतर होऊ लागला. दुपार सुद्धा झाली होती. म्हणावं तितकं ऊन नसलं तरी गड

चढल्यामुळे एव्हाना सगळे घामाघूम झाले होते. मागे वळून पाहता खाली तुंगवाडी गाव दिसत होते व गावातली छोटी छोटी दिसणारी घरे मनोवेधक वाटत होती.

पुन्हा पुढे चालू लागलो आणि बघतो तर काय कातळातून जाणारी एक उभी वाट होती. सरळ वर जाणे फारच त्रासदायक होते. तरीही आम्ही एकमेकांना धीर देत हळूहळू हा अवघड टप्पा पार केला. शिवाय



उतरताना हा टप्पा किती अवघड जाईल हेसुद्धा मनीच ताडले.

वर गेल्यावर एक छोटीशी गुहा लागली तिथे आराम केला. आणि फोटोसेशन तर चालूच होते हे वेगळं सांगायला नको. अजून गडाचा मुख्य महादरवाजा खूप वर होता. अशा वेळी जास्त विश्रांती करणे ठीक नव्हते. त्यामुळे आम्ही थोडा आराम करून लगेच पुढे चालू लागलो. मजल दरमजल करत आम्ही एकेक टप्पा पार केला.



आता फार उंचावर पोहोचलो होतो आणि खाली पाहता विस्तीर्ण पवनेचं खोरं व दूरवर तिकोनाही दिसत होता.

अधून मधून थोडा ब्रेक चालू होताच. अशातच आणखी एका एक समस्या उद्भवली. किल्ल्यावरच्या वाटेत एक वेगळ्याच प्रकारच्या माशा होत्या. त्या सारख्या घोळक्याने आमच्या भोवती घोंगावत होत्या. घामाघूम झालेल्या अशा अवस्थेत त्यांच्यामुळे आम्हाला अधिक त्रासदायक वाटत होते. मग आम्ही चालण्याचा वेग वाढवला. भरभर चालू लागलो. आता सरळ पाय वाट दिसू लागली. एक हलकी चढण चढलो आणि झालं... समोर महादरवाजा दिसू लागला. हाहा... सगळे खुष! अखेर दरवाजापाशी आलो. पण तिथे आमचं स्वागत करण्यासाठी तर एक वेगळेच महाशय थांबले होते. एक निष्पाप शांत कुत्रा! महादरवाजात आमच्याकडे टक लावून निपचित बसला होता...






आम्ही फोटो काढायला सुरुवात केली. त्याला हाकलण्याचे खूप प्रयत्न आम्ही केले पण साहेब काही जागचे हलेनात. महादरवाजातून आम्ही वर आलो.


चारही बाजूंनी विस्तीर्ण मोकळा परिसर पाहून आम्ही सुखावलो. एका बाजूला दूरवर किल्ल्याचे एक टोक दिसत होते. तिथे झेंडा रोवला होता. अनेक बुरुज दिसत होते. तिथून पुढे दिसणारा डोंगर किल्यासारखा भासत

होता. पण ते नक्की काय आहे हे माहीत नव्हते. घरी परतल्यावर नेटवर माहिती काढली तेव्हा कळलं की तो मोरगिरी किल्ला होता. किल्ल्याच्या चारही बाजूंनी आम्हाला नेत्रसुखद परिसर दिसत होता. इथे अजून एक छोटसं गणेशाचं मंदिर आहे. काही ठिकाणी तटबंदी आहे. महादरवाजा मात्र चांगल्या



स्थितीत होता. वर इतकी थंड हवा होती की तिथेच अंग टाकून झोपून जावंस वाटत होतं. फारच मस्त वाटत होतं. सोबत आणलेली शिदोरी खोलली आणि सावलीत विसावा घेतला.






गडाचा फेरफटका सुरू केला. आता आम्हाला गडाचं सर्वोच्च शिखर खुणावत होतं. पण ते सर करणं काही खायची गोष्ट नव्हती. एक अवघड वाट मंदिराच्या बाजूने गेली होती. दोघाजणांनी वर न येणे पसंत केले आणि पाच जण जाऊ लागलो. दगडादगडातून जाणारी ही वाट कसोटी पाहणारी होती.

आमचे पाऊल त्या ठिकाणी पडले. आता आम्ही एका उंच टोकावर होतो. वर आल्यावर चहुबाजूंच्या डोंगररांगा पाहून मन अगदी हेलावून गेलं. दूरवर लोहगड किल्ला आणि विसापूर किल्ला दिसू लागला आणि दोन वर्षापूर्वीच्या एनएसएसच्या आठवणी ताज्या झाल्या...

एकीकडे मोरगिरी किल्ला, दुसरीकडे तिकोना किल्ला अशा किल्ल्यांच्या या माळेने जणू चहू बाजूंना आभूषित केले होते. पवनेचा विस्तीर्ण जलाशय आता नजरेच्या टप्प्यात



होता. छोटे छोटे कॅम्प सुद्धा दिसू लागले. एवढी मेहनत केली ती केवळ यासाठी!




वर तुंगाई देवीचं मंदिर आहे. त्यावरून किल्ल्याचं नाव आहे हे वेगळं सांगायला नको. नंतर शिवरायांनी या किल्ल्याचं नाव 'कठीणगड' असं ठेवलं आणि कठीणगड का ठेवलं हे तुम्हाला तिथं गेल्यावरच कळेल. इथं पाय मोकळे करून बराच वेळ आम्ही निसर्गाचं रूप न्याहाळत बसलो होतो. मगाशी आकाशात पसरलेल्या सशासारख्या पांढऱ्याशुभ्र

ढगांचा आता रंग आता पालटला होता.



दुपारचे तीन वाजले होते. आकाशात एक वेगळीच छटा गडद पसरली होती आणि जणू ते आसमान आम्हाला काहीतरी सुचना देत होतं. जोरदार वाराही काहीवेळाने सुरू झाला. पाऊस येणार असं आता वाटू लागलं. त्यामुळे लवकरात लवकर गडावरून काढता पाय घेणं भाग होतं. गडावर चढताना आम्ही तोल सावरत एकमेकांना देत आलो होतो. पण जर पाऊस पडला असता तर खाली उतरणे जीवघेणे ठरले असते. त्यामुळे आम्ही तिथून निघायचं ठरवलं. डोंगरदऱ्याना डोळ्यात एकदा मन भरून साठवलं. उतरायला सुरुवात केली. मुख्य पठारावर आलो. तिथून दोघांना घेतलं व गडाच्या दरवाजातून बाहेर पडलो. नभात काळोख भरून आला होता. आमची पावले भरभर पण काळजीपूर्वक पडत होती.

गडावर भेटलेला पाहुणा आता आमचा मोरक्या बनला होता. उतरताना आमच्या पुढे पुढे चालू लागला की आम्ही थांबलो की तोही थांबत असे. आम्ही अवघड उतारावरून हात टेकून उतरू लागलो की तो डोळे मिचकावत आमच्याकडे बघत असे. नवल म्हणजे या संपूर्ण दिवसात मी त्याला एकदाही भुंकताना बघताना पाहिले नाही. त्यालाही लवकर गड उतरायचा होता. हे त्याच्या अस्वस्थपणातुन दिसत होते. वातावरणातील बदल प्राण्यांना आपल्या पेक्षा लवकर कळतं. खरंय ते!

अर्धा गड जवळ जवळ उतरला. आता पुन्हा तीच मधली अरुंद वाट लागली जिने यायच्या वेळी आमची परीक्षा पाहिली होती. पण आता उतरताना तर अजून बिकट होतं. शिवाय सोबत मुलीसुद्धा होत्या. ट्रेकींगसाठी जाणाऱ्या पोरी या रणरागिनीच असतात. आव्हानं स्वीकारणाऱ्या. तशा त्या दोघीही होत्या. आम्ही आधार देत एकमेकांना खाली उतरवलं. मग सोपी वाट सुरु झाली. आता आमचा म्होरक्या तुरुतुरु धावू लागला. मग आम्हीही वेग वाढवला आणि काही वेळाने तो गायब झाला. आम्ही काही वेळाने पायथा गाठला आणि हे महाशय आमच्या गाड्यांजवळ बसले होते. जणूकाही आमचा अखेरचा निरोप घ्यायला आला होता. आम्ही त्याचे खूप लाड केले पण आता निघायची वेळ आली होती. माहित नव्हतं की हा किल्ला, हा परिसर, हा कुत्रा

या सगळ्यांची पुन्हा कधी भेट होईल. पण कुठेतरी पोहोचण्यासाठी कुठून तरी निघावं लागतं ना!

गड उतरून आम्ही निश्चिंत झालो. पण आपल्या प्लॅनमध्ये तर पवना लेकसुद्धा होता हे तर आम्ही विसरूनच गेलो होतो. त्यामुळे पुढे काय करायचं हे आम्ही ठरवू लागलो. काही लोक म्हणाले की आता नको जायला कारण पाऊससुद्धा येईल व पुढे रस्ता सुद्धा खूप खराब आहे. त्यापेक्षा लोणावळ्याहून आपण घरी जाऊ. तर आता आलोय तर आल्यासारखं पाहून जाऊ असंही म्हणणारे काही मंडळी होती. तसंही परत कधी इकडे येऊ की नाही हे पण होतं. त्यामुळे गाड्या वळवल्या आणि आम्ही आलो त्याच मार्गाने निघालो.

पवनेचा विस्तार फार मोठा होता. पण नक्की याचा किनारा कुठून गाठायचा ते कळत नव्हतं. पुन्हा गुगल मॅप्स मदतीला आले आणि तो रस्ता आम्ही पकडला. पण तो रस्ता तिथे जिथे संपला तिथे एक उजाड माळरान होतं. तलाव तर कुठेही दिसत नव्हता. असा अनुभव मला यापूर्वीसुद्धा बऱ्याच वेळा येऊन गेलाय. जवळच काही घरं होती. शिवाय कॅम्पिंगचे बॅनर सुद्धा लावले होते. तिथल्या एका बाईला आम्ही लेककडे जाण्याचा रस्ता विचारला. काही वेळातच आम्ही त्या अथांग निळाशार पाण्याच्या समोर पोहोचलो. आम्ही गाड्या झाडांखाली लावल्या. आम्ही पुढे जाणार तोच एक माणूस तिथे आला आणि त्याने आम्हाला अडवले व तिकडे जायला परवानगी नाही असं सांगितलं. आमच्या कपाळाला आठ्या पडल्या. आम्ही त्याला कारण विचारलं तर त्याने सांगितलं की ही जमीन त्यांनी खाजगी वापरसाठी कॅम्पिंगकरिता

विकत घेतली आहे. तिथे त्यांचं पॅकेज घेतल्याशिवाय जाता येत नाही. आमचा पुरता हिरमोड झाला. आणखी कोणत्या बाजूने जायला मिळेल का असं त्याला विचारलं. तर त्यांनी सांगितलं की संपूर्ण किनारा हा विकला गेला हे ऐकून आम्ही चकितच झालो. त्यामुळे आता बाहेरून फोटो काढणे हेच आमच्या हाती उरलं होतं.



अशा तऱ्हेने आम्ही ट्रिपची सांगता केली. पुढे काही वेळाने तिकोना किल्ला आला. तिथेही काही वेळ बसलो आणि परतीच्या प्रवासाला लागलो. पुन्हा एकदा आम्ही ट्रिपल सीट व बाकी दोन गाड्या पुढेमागे होत्या. पाखरासारखे आम्ही भुरकन उडून गेलो. अंतर हळूहळू कापले जात होते. आजचा दिवस फार मजेत गेला होता आणि भलेही सर्वांचे पाय दुखत असले तरीही, अचानक ठरल्यामुळे काही तितक मोठ प्लॅनिंग झालं नव्हतं. तरीही एक आठवणीत राहील अशी झाली होती.

नभांना आता पावसांचे थेंब जड झाले होते आणि मग त्यानेही मुक्तपणे बरसात केली. त्यामुळे आम्ही आसरा शोधू लागलो. जवळच्याच एका गावात एक छोटेखानी हॉटेल दिसलं. ते रस्त्याच्या बाजूला होतं. त्यामुळे आम्ही आमच्या गाड्या तिथेच लावल्या.

रिमझिम सरी बरसत होत्या. मागून हॉटेलमधून वास दरवळत होता. तसही दुपारी जेवलो नव्हतो. मग काय पावलं आपोआपच तिकडे वळली आणि या वेळी सगळ्यांना विचारण्याची वेळच आली नाही. गरमागरम कांदा बटाटाभजी आणि समोर रिमझिम बरसता पाऊस! या दिवसातला हा आणखी एक सुंदर क्षण होता. मग भलेही ते पवना लेक नाही पाहायला भेटलं याचं वाईट वाटत नव्हतं. पण जुळून आलेला क्षण त्यापेक्षाही सोनेरी भासत होता. ते म्हणतात ना कितीही प्रयत्न करावे एखादी गोष्ट मिळवण्यासाठी पण जर ती मिळायची असेल तर मिळते पण आपल्या नशिबात नसेल तर ती नाही मिळत !

घरी गेल्यावर मी स्टोरीला टाकलेले फोटो पाहिल्यावर एका मित्राने मला सांगितले की आमच्या कॉलेजमधली मुलं तिथे मागच्या वर्षी बुडाली होती त्यामुळे तिकडे जाऊ नका. हायसे वाटले.

जे होते ते भल्या करताच, खरंय!



पाउसही आता ओसरला. संध्याकाळसुद्धा झाली होती. मला पुन्हा ट्रेनने जायचं होतं. मी मोबाईलवर लोकलचा टाईम पाहू लागलो. पण मोबाईल तर मरायच्या अवस्थेत होता. पावर बँकचं कसंतरी जुगाड केलं. रात्रीचं जेवण हे घनाची पार्टी होती. खडकी मिलिटरी कॅन्टीन ला जायचं असं आम्ही ठरवलं होतं. त्यामुळे आता मला खडकीला उतरायला भाग होतं.  चला आम्ही निघालो.

जवळ जवळ नऊ वाजले असतील. आता आम्ही हॉटेलला पोहचून ऑर्डर देऊन मोकळे झालो. भुकेमुळे सगळ्यांच्या पोटात उंदीर ओरडत होते. ऑर्डर तर दिली होती. पण ती येईपर्यंत आम्ही खूप वेळ वाट पाहिली. शेवटी ती वेळ आली. तर समोर चिकनची प्लेट दिसू लागली. शरीर थकले होते. पाय दुखत होते. पोट भुकेने आवळले होते. अशातच चिकन समोर दिसताच

सगळ्यांच्या चेहऱ्यावर ते क्रूर स्मित आले. सगळेच्या सगळे एकाच क्षणी त्यावर तुटून पडले. एरवी खाण्यापूर्वी त्याचा फोटो काढण्याचा रितीरिवाज त्यादिवशी मात्र सगळेजण विसरले! बघता बघता सगळं संपलं ही. रात्रही हळूहळू गडद होत गेली. आम्ही आता रुमवर पोहोचलो होतो व एक ट्रेक पूर्ण झाला होता. पण ना असं कधी प्लॅन केला होता ना असा कधी अकस्मात झाला होता.

काही वर्षांपूर्वी मला माझ्या एका मित्राने एक इंग्रजी पुस्तक वाचायला दिलं होतं त्यात उल्लेख होता की ज्या दिवशी तुम्हाला वाईट वाटेल, जगावसं वाटणार नाही त्या दिवशी तुम्ही या शंभर गोष्टी करा त्यामुळे तुमचे मनोबल वाढेल व जगण्याची नवी उर्मी तुम्हाला मिळेल ही शंभर टक्के गॅरंटी. त्यात पहिलं टास्क होतं की असं समजा तुम्ही मृत्युशय्येवर आहात शब्दशः नाही

म्हणजे तुम्ही बेडवर पडून शेवटचे श्वास मोजत आहात असं समजा अशा वेळी तुम्हाला जन्मापासून मृत्यूपर्यंत भेटलेल्या सगळ्या व्यक्ती तुम्हाला भेटायला आल्या आहेत असं समजा. तसेच मी एक सुचवू शकतो. असं मानून चला की तुम्हाला व्यक्ती नाहीतर प्रसंग आठवायचे आहेत. लहानपणापासून ते मृत्यूपर्यंत आयुष्यात घडलेले सारे प्रसंग अशावेळी सगळ्यात पहिले कोणते असे विशेष प्रसंग आहेत जे तुमच्या समोर येताच तुम्ही पुन्हा एकदा आठवणींच्या दुनियेत हरवून जात आणि त्या सुंदर आठवणींवर स्वार होऊन मुक्तपणे गतकाळामध्ये रममाण होऊन भरारी घ्याल? आठवा आठवा!! पण जर तुम्हाला विशेष असं काही आठवत नसेल तर मग आत्ताच बाहेर पडायची गरज आहे. तेव्हा तयार व्हा आणि बाहेर पडा पायाला चाकं बांधून!

**थोडंसं गडाविषयी...**


जिल्हा : पुणे

श्रेणी : मध्यम

किल्ल्याची ऊंची :3000

प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: लोणावळा



तुंग किल्ला हा एक घाटसंरक्षक दुर्ग म्हणून ओळखला जातो. या किल्ल्याचा उपयोग पूर्वी बोरघाटामार्गे चालणाऱ्या वाहतुकीवर नजर ठेवण्यासाठी होत असे.

**इतिहास** : १६५७ मध्ये मावळ प्रांतातील इतर किल्ल्यांसमवेत हा किल्ला स्वराज्यात सामील झाला. सन १६६० मध्ये या भागाच्या सुरक्षिततेसाठी नेताजी पालकर यांची नियुक्ती झाली. जयसिंगाने आणि दिलेरखानाने आपल्या स्वारीच्या वेळी ६ मे १६६५ रोजी तुंग आणि तिकोना या भागातील अनेक गावे जाळली पण, हे किल्ले मात्र जिंकू शकले नाही. १२ जून १६६५ पुरंदर

तहानुसार, १८ जूनला कुबादखानाने हलालखान व इतर सरदारांसोबत ह्या परिसराचा ताबा घेतला.

**पहाण्याची ठिकाणे** : एक तासात सर्व गड पाहून होतो. तुंगवाडीकडे जाणारी वाट मारुतीच्या मंदिरा जवळून जाते. या मंदिरात ५ ते ६ जणांची राहण्याची सोय होऊ शकते. या मंदिरापासून पुढे रस्ता गेलाय तिथून गडावर जाण्यासाठी पायऱ्या लागतात. पायऱ्यांच्या वाटेत थोड्याच अंतरावर हनुमान मंदिर लागते. पुढे गोमुखी रचनेचा महादरवाजा आहे. तिथून आत गेल्यावर आपण गडमाथ्यावर पोहोचतो. उजवीकडे गणेशाचे मंदिर आहे. येथूनच पुढे बालेकिल्ल्यावर वाट जाते. बालेकिल्ल्यावर तुंगदेवीचे मंदिर आहे. मंदिरा समोरच जमिनीत खोदलेली गुहा आहे. अशा प्रकारे एक दिवसात किल्ला पाहून परतता येते.

## निरोप घेताना...

ट्रेकिंग करण्यामागे अनेक उद्देश असतात. त्यापैकी सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ट्रेकिंगच्या निमित्ताने वेगवेगळ्या प्रदेशांना वेगवेगळ्या ठिकाणांना भेट देणे. तिथली संस्कृती, वेगवेगळ्या गावातली संस्कृती समजून घेणे. तिथले पर्यावरण, डोंगर-दऱ्या, वातावरण याची माहिती करून घेणे. शिवाय ट्रेकिंगमुळे आपल्याला स्वतःला समजून घेता येतं. कधी एखाद्या उंच गडावर जाऊन दूरवरच्या क्षितिजाकडे पाहून तुम्हाला तुमच्या अंतर्मनाने कधी हाक दिली आहे का? कधी इतकी शांतता अनुभवलीय का की तुम्हाला फक्त तुमच्या हृदयाची धडधड ऐकू येईल? हो. असं घडतं. तुमचं मन स्वतःशी संवाद घालू लागतं. त्यासाठीच गरजेचे आहे कधीतरी निसर्गासोबत दोन क्षण घालवणे.

गड-किल्ल्यांच्या सहवासात राहिल्याने आपल्याला आपली क्षमता कळते. आव्हानं स्वीकारणं, आव्हान पेलणे व दुःखांवर मात करणं, आपण यशाची उंच शिखर कसे गाठू शकतो हेसुद्धा आपल्याला गड-किल्ल्यांना यांच्या प्रवासातून समजतं. इतर सर्वांना गड किल्ले हे दगड वाटतात. पण ज्याला इतिहासाची खरोखर आवड आहे. त्यांच्यासाठी मात्र गड-किल्ले ही त्या काळाची ती ऐतिहासिक वास्तू असते अगदी जशीच्या तशी किल्ल्यावर गेल्यानंतर त्या काळचा इतिहास अगदी जसाच्या तसा समोर उभा राहतो. मग त्या काळची लोक, ते राजवाडे, महाल सगळं काही जिवंत समोर दिसू लागतं. कधी तुम्ही रायगड किल्ल्यावर गेला असलात तर  मेघडंबरीतील सिंहसनाधिष्ठित शिवाजी महाराजांच्या नतमस्तक होऊन मागे पाहिलेच तर समोर पूर्ण दरबार उभा राहून छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करीत

आहेत असे जर तुम्हाला भासले नाहीत तर तुम्ही शिवभक्त नाहीच. हा एक दृष्टिकोन आहे प्रत्येकाचा. बघायला गेलो तर सर्वकाही आहे नाहीतर गड किल्ले म्हणजे दगडच आहेत. हे गड किल्ले संवर्धन करणं ही आपली जबाबदारी आहेत. नाहीतर खरोखरच आपल्या पुढच्या पिढीला बघण्यासाठी इतिहासही राहणार नाही आणि किल्ले ही...

**माहिती सौजन्य:**

Trekshitiz.com

कशी वाटली तुंग किल्ल्याची सफर ?

तुम्हाला नक्कीच आवडली असणार अशी आशा करतो. आवडली असेल तर मनात न ठेवता माझ्या मेलवर लवकर तुमचे अभिप्राय कळवा. काही सूचना असतील तर त्या हि सांगा. तुमच्या सूचनांचे स्वागतच ! आणि हो तुमच्या अशाच अविस्मरणीय प्रवासाविषयी मला नक्की कळवा.


माझी पुढची प्रवासवर्णने लिहिण्यासाठी तुमचे अभिप्राय नक्कीच प्रोत्साहन देतील.

-ओंकार अशोक झांजे

माझा मेल पत्ता:  omkar.zanje1@gmail.com

Whatsapp: 7770099295

धन्यवाद!






# ओंकार झांजे

## यांची प्रकाशित पुस्तके

## कव्हरवर क्लिक करा

**फक्त एकदा**






दुर्ग दुर्घट भारी

*आसेतूहिमाचल*

सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण...

कारण तुम्ही लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल

वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या "मी पाहिलेला…" सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. वाटा आणि वळणांचा आनंद वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा.

esahity@gmail.com